## शाळा स्थलांतराबाबत

मान्यताप्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांचे स्थलांतर करावयाचे असल्यास अशा शाळांचे प्रस्ताव क्षेत्रिय अधिका-यांमात तपासणी करुन या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची छाननी या कार्यालयाच्या स्तरावरुन करुन शाळा स्थलांतरास परवानगी मिळणेबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केले जातात.

**शाळा स्थलांतर प्रस्तावाबाबत खाली नमूद केलेल्या मुददयांबाबतची कागदपत्रे आवश्यक आहेत.**

१. संस्थेच्या सदरील प्राथमिक शाळांस शासनाची परवानगी/ मान्यता आहे किंवा कसे ? असल्यास कोणत्या शासन आदेशान्वये, आदेशाचा क्रमांक व दिनांक द्यावा

२. शाळा स्थलांतर करण्यामागे नेमके कारण काय आहे. संस्थेने शाळा प्रस्तावित ठिकाणी स्थलांतरीत केली आहे काय ? असल्यास केंव्हापासून ?

३. मूळ ठिकाण व स्थलांतर ठिकाण यामधील अंतर किती आहे ?

४. स्थलांतरीत ठिकाणी संस्थेने शाळेसाठी आवश्यक ती पुरेशी जागा, खेळाचे मैदान, फर्निचर व इतर शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता केली आहे काय ?

५. स्थलांतरीत ठिकाणी शाळेच्या परिसरात असलेल्या इतर शासकीय व खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांची संख्या किती आहे व त्यामधील विद्यार्थी पटसंख्या किती आहे ?

६. मूळ ठिकाणीची सदरहू शाळेतील सध्याची विद्यार्थी पटसंख्या किती आहे ?

७. सदरहू प्राथमिक शाळेस स्थलांतराची परवानगी दिल्यास त्याचा इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होईल किंवा कसे ?

८. शाळा स्थलांतर परवानगी दिल्यास मूळ ठिकाणच्या सदरहू शाळेतील विद्यार्थ्यांची सोय कशी करण्यांत येणार आहे. ?

९. मूळ ठिकाणच्या शाळेतील सर्व शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांचे स्थलांतरीत शाळेचे समायोजन करण्यांत येणार आहे किंवा कसे ? व संस्थेने तसे हमीपत्र दिले आहे किंवा कसे ? दिले असल्यास त्याची प्रत पाठवावी.

१०. सदर प्राथमिक शाळेच्या स्थलांतराबाबत आपले अभिप्राय काय आहेत ?

११. सदरची शाळा सध्या सुरु आहे काय ?

१२. सदरच्या शाळेतील मान्य शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांची स्थलांतरास सहमती आहे कायए असल्यास त्या बाबतचे संमतीपत्र दिलेले आहे काय ?

१३. स्थलांतरीत परिसरतील ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थी संख्या.

१४. स्थलांतरीत जागेबाबत न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे ?

१५. स्थलांतराचे ठिकाण

१६. स्थलांतरीत होणा-या शाळेतील वर्गनिहाय मुलामुलींची संख्या सादर करावी.

१७. जर त्या शाळेतील मुलांना दुस-या शाळेत जाण्यासाठीचे अंतर ५ कि.मी. पेक्षा जास्त असेल तर ज्या शाळेत विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येणार आहे. त्या शाळेत असलेली १. वर्ग निहाय मुलामुलींची पट संख्या व २. मुले सामाऊन घेण्यासाठी लागणा-या सुविधा याबाबत माहिती द्यावी.

१८. स्थलांतर होऊ पहाणा-या शाळा यांचे अनुदान कुठल्या तत्वावर आहे याबाबतची माहिती देण्यांत यावी.

१९. ज्या शाळेत त्या मुलांचे समायोजन करावयाचे प्रस्तावित आहे. त्या शाळेच्या अनुदान तत्वाबद्यल माहिती द्यावी.

२०. ज्या शाळेत स्थलांतर होऊ पहाणा-या शाळेतील मुलांची सोय करण्यांत येणार असेल त्या शाळेला नवीन तुकडी देण्याची गरज भासेल काय व ती कुठल्या अनुदान तत्वावर अनुदान देण्याची आवश्यकता भासेल याबाबतचे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावे.

२१. जर स्थलांतर होऊ पाहणारी शाळा अनुदान तत्वावर असेल आणि विद्यार्थी ज्या शाळेत जातील ती शाळा कायम विनाअनुदान तत्वावर असेल तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल काय, याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावेत.